सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जागतिक बँक

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २

# पर्यावरणीय व सामाजिक बांधिलकी आराखडा





प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मुंबई,
कृषी विभाग

# कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

# दूसरा टप्पा II

# (P५१०४२९)

# पर्यावरणीय आणि सामाजिक

# बांधिलकी आराखडा (ESCP)

**संक्षिप्त रुपे**

| | |
|---|---|
| SEP | भागधारक सहभाग योजना |
| ESCP | पर्यावरणीय आणि सामाजिक बांधिलकी आराखडा |
| LMP | कामगार व्यवस्थापन प्रक्रिया |
| IPNM | एकात्मिक कीड व्यवस्थापन व एकात्मिक अन्नद्रव्यं व्यवस्थापन योजना |
| SEA | लैंगिक शोषण आणि गैरवापर |
| SH | लैंगिक छळ |
| DoA | कृषी विभाग |
| PIE | प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा |
| ESS | पर्यावरणीय आणि सामाजिक मानके |
| E&S | पर्यावरणीय आणि सामाजिक |
| POCRA | नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प |
| PMU | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष |
| DPIU | जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष |
| SPIU | उपविभागीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष |

**पर्यावरणीय आणि सामाजिक बांधिलकी आराखडा**

१. महाराष्ट्र राज्य (प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा / The Project Implementing Entity or PIE) कर्ज करार आणि प्रकल्प (करार) मध्ये नमुद केल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्याच्या कृषी विभागाच्या (Department of Agriculture-DoA) सहभागासह नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (POCRA) टप्पा-२ अंमलात आणेल. करारांमध्ये नमुद केल्याप्रमाणे, पुनर्निर्माण आणि विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक प्रकल्पासाठी वित्तपुरवठा करण्यास सहमत आहे.

२. PIE हे सुनिश्चित करेल की प्रकल्प पर्यावरणीय आणि सामाजिक मानके (ESS) आणि या पर्यावरणीय आणि सामाजिक वचनबद्धता योजनेनुसार (ESCP) बँकेला स्वीकारार्ह पद्धतीने पार पाडला जाईल. ESCP हा कराराचा एक भाग आहे. या ESCP मध्ये अन्यथा परिभाषित केल्याशिवाय, या ESCP मध्ये वापरल्या जाणाऱ्या महत्वाच्या संज्ञांचा अर्थ करारात नमुद केलेला आहे.

३. ESCP उल्लेखित बाबींपुरत्या मर्यादित न राहता, PIE साठी महत्त्वाच्या उपाययोजना आणि कृती आराखडा निश्चित करते, ज्यामध्ये आवश्यकतेनुसार संस्थात्मक रचना, कर्मचारी भरती, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणी, देखरेख आणि अहवाल व्यवस्था आणि तक्रार व्यवस्थापन कालमर्यादेसहित PIE ने अवलंब करणे अपेक्षित आहे. ESCP पर्यावरणीय आणि सामाजिक (E&S) दस्तऐवज देखील निश्चित करते जे प्रकल्पांतर्गत तयार केले जातील तथा अद्ययावत केले जातील, सल्लामसलत केली जातील, प्रकाशित केले जातील आणि अंमलात आणले जातील, जे ESS शी सुसंगत असून बँकेला स्वीकार्य असेल. वरील E&S दस्तऐवज वेळोवेळी बँकेच्या पूर्व लेखी करारासह सुधारित केले जाऊ शकतात. या करारात नमुद तरतूदी प्रमाणे, PIE सुनिश्चित करेल की ESCP अंमलबजावणीचा खर्च भागविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.

४. बँक आणि PIE यांनी मान्य केल्याप्रमाणे, आवश्यक असल्यास, प्रकल्पातील बदलांचे किंवा अनपेक्षित परिस्थितींच्या अनुरूप किंवा प्रकल्प कामगिरीच्या प्रतिसादात, या ESCP मध्ये वेळोवेळी सुधारणा केली जाऊ शकते. अशा परिस्थितीत, बँक आणि PIE ESCP मध्ये सुधार करण्यास आणि त्यांना लागू करण्यासाठी सहमत आहेत. हे बदल बँक आणि करारामध्ये नमुद PIE चा प्रतिनिधी अथवा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) यांच्यामधील स्वाक्षरी केलेल्या पत्रव्यवहाराद्वारे अंमलात आणले जातील. PIE त्वरित सुधारित ESCP प्रकाशित करेल.

५. ESCP च्या अनुकूल अंमलबजावणी सुरू करण्यासाठी, प्रकल्पाच्या तयारीचे मूल्यांकन करण्यासाठी देखरेख करायच्या कृती आणि उपाययोजना “अंमलबजावणी तयारीसाठी निर्देशक” या उपविभागात दिलेले आहेत. या ESCP मधील सर्व कृती आणि उपाययोजना संदर्भित उपविभागात सूचीबद्ध केल्या आहेत, त्या "कालावधी" स्तंभात नमुद केल्याप्रमाणे कालबद्ध पद्धतीने अंमलात आणल्या जातील.

| | उपाय आणि कृती | कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| **अंमलबजावणी व्यवस्था आणि क्षमता सहाय्य** | | | |
| A | **संघटनात्मक रचना**<br>प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणा(PIE) संपूर्ण प्रकल्प कालावधीत एक संस्थात्मक रचना स्थापन करेल आणि राखेल ज्यामध्ये प्रशिक्षित कर्मचारी/तज्ञ, पर्यावरण विशेषज्ञ आणि सामाजिक विकास विशेषज्ञ (PMU), प्रकल्प विशेषज्ञ कृषी व्यवसाय आणि प्रकल्प विशेषज्ञ मानव संसाधन (जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष) तसेच गरजेनुसार विशिष्ट कार्ये आणि असाइनमेंटसाठी अल्पकालीन सल्लागार/संसाधन व्यक्ती आणि एजन्सी यांचा समावेश असेल.PIE पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन चौकट आणि संबंधित योजना/प्रक्रियांच्या अंमलबजावणीसाठी पुरेसे वित्त सहाय्य सुनिश्चित करेल. | प्रकल्प प्रभावी तारखे पासून ९० दिवसांच्या आत आणि प्रकल्प कार्यसुरू होण्यापूर्वी, आणि त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान ही पदे कायम राहतील. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(PMU) |
| B | **क्षमता बांधणीचे उपाय**<br>संबंधित भागधारकांसाठी गरजेनुसार प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीचे उपाय तयार करणे आणि अंमलात आणणे.<br>· भागधारक सहभाग योजना<br>· पर्यावरणीय आणि सामाजिक व्यवस्थापन चौकट<br>· पर्यावरण आणि सामाजिक व्यवस्थापन योजना आणि प्रक्रिया<br>· व्यावसायिक आणि सामुदायिक आरोग्य आणि सुरक्षितता<br>· कामगार व्यवस्थापन प्रक्रिया<br>·एकात्मिक कीड व्यवस्थापन व एकात्मिक अन्नद्रव्यं व्यवस्थापन योजना (IPNM)<br>· प्रकल्पाशी संबंधित कामगारांसाठी लिंग आधारित हिंसाचार, लैंगिक शोषण आणि गैरवापर (SEA), लैंगिक छळ (SH)<br>· तक्रार निवारण उपाय | प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान आत्मसात करणे आणि अंमलात आणणे . | (PMU)/जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (DPIU)/ उपविभागीय प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (SPIU) |

| | उपाय आणि कृती | कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| **देखरेख आणि अहवाल देणे** | | | |
| C | **नियमित अहवाल देणे**<br>प्रकल्पाच्या पर्यावरणीय, सामाजिक, आरोग्य आणि सुरक्षितता (E&S) कामगिरीवर नियमित देखरेख अहवाल तयार करणे आणि बँकेला सादर करणे. अहवालामध्ये खालील गोष्टी समाविष्ट असतील.<br>· ESCP अंतर्गत आवश्यक असलेल्या कृतींच्या अंमलबजावणीची स्थिती<br>· भागधारक सहभाग योजनेची अंमलबजावणी.<br>· प्रकल्पाशी संबंधित तक्रार यंत्रणेची स्थिती, प्राप्त झालेल्या तक्रारी आणि त्यांचे निराकरण करण्यात झालेली प्रगती.<br>· ESMF आणि ESMP (E&S चेकलिस्ट) अंमलबजावणीची स्थिती, ज्यामध्ये IPNM, IPPF, LMP आणि SEP यांचा समावेश आहे<br>· खाली नमुद केल्याप्रमाणे कारवाई E अंतर्गत नोंदवलेल्या घटना आणि अपघातांच्या निराकरणाची संख्या आणि स्थिती | प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान बँकेला सहामाही अहवाल सादर केले जाईल. प्रत्येक अहवाल कालावधी संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत सादर केले जाईल | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(PMU) |
| D | **कंत्राटदारांचे अहवाल**<br>लागू असल्यास, कंत्राटदारांनी संबंधित बोली कागदपत्रे आणि करारांमध्ये, निर्दिष्ट केलेल्या मेट्रिक्सनुसार E&S कामगिरीवर देखरेख अहवाल सादर करणे आणि असे अहवाल PMU ला सादर करणे आवश्यक आहे. | सदरील कृती C अंतर्गत सादर करायच्या अहवालांना परिशिष्ट म्हणून बँकेला अहवाल सादर करण्यात येईल. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(PMU) |
| E | **घटना आणि अपघात**<br>पर्यावरण, समुदाय, जनता किंवा कामगारांवर लक्षणीय प्रतिकूल परिणाम घडवणाऱ्या किंवा घडण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही घटना किंवा अपघाताची माहिती बँकेला दिली जाईल. यामध्ये मृत्यू, गंभीर दुखापत, हिंसाचार, भेदभाव, सांस्कृतिक वा जैवविविधतेवरील परिणाम, प्रदूषण, जबरदस्तीचे विस्थापन, बालमजुरी, लैंगिक शोषण वा छळ, आणि रोगप्रसार यांचा समावेश आहे.<br>घटनेचे मूळ कारण शोधण्यासाठी योग्य तपासणी केली जाईल व पुनरावृत्ती टाळण्यासाठी सुधारात्मक कृती आराखडा तयार करून बँकेच्या सहमतीने अंमलात आणला जाईल.बँकेच्या विनंतीनुसार संबंधित माहिती सादर केली जाईल. | घटनेची किंवा अपघाताची माहिती मिळाल्यानंतर ४८ तासांच्या आत बँकेला कळविणे. विनंतीनुसार उपलब्ध तपशील देणे.<br><br>बँकेने लेखी स्वरूपात वेगळी कालमर्यादा मान्य केली नसल्यास, प्रारंभिक सूचना सादर केल्यानंतर १० दिवसांच्या आत बँकेला पुनरावलोकन अहवाल आणि सुधारात्मक कृती योजना द्या. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(PMU) |

| | उपाय आणि कृती | कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| | **ESS १: पर्यावरणीय आणि सामाजिक धोके आणि परिणामांचे मूल्यांकन आणि व्यवस्थापन** | | |
| १.१ | पर्यावरणीय आणि सामाजिक मूल्यांकन आणि/किंवा योजना<br>१. प्रकल्पासाठी संबंधित ESSs शी सुसंगत पर्यावरणीय आणि सामाजिक व्यवस्थापन चौकट (ESMF) तयार करणे आणि अंमलात आणणे .<br>२. ESMF मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपक्रमानूरूप पर्यावरणीय आणि सामाजिक व्यवस्थापन आराखडा (ESMP) (E&S चेकलिस्ट) तयार करणे आणि अंमलात आणणे. ESMF मध्ये वगळण्यात आलेल्या यादीमध्ये नमुद केलेले उपक्रम प्रकल्पांतर्गत निधी मिळविण्यास अपात्र असतील.<br>३. ESMF चा भाग म्हणून कामगार व्यवस्थापन प्रक्रिया आणि आदिवासी लोक नियोजन चौकट (IPPF) स्वीकारणे आणि अंमलात आणणे. | १.प्रभावी तारखेपासून ९० दिवसांच्या आत कामगार व्यवस्थापन प्रक्रिया आणि आदिवासी लोकांच्या नियोजन चौकटीसह ESMF तयार करणे आणि त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान ESMF ची अंमलबजावणी करणे.<br>२. ESMP (E&S चेकलिस्ट) तयार करणे आणि अंतिम झाल्यानंतर बोली कागदपत्रांमध्ये त्यांचा समावेश करणे, प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान संबंधित ESMP (E&S चेकलिस्ट) ची अंमलबजावणी करणे. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(PMU) |
| १.२ | कंत्राटदारांचे व्यवस्थापन<br>खरेदी दस्तऐवजांच्या E&S तपशीलांमध्ये आणि कंत्राटदारांसोबतच्या करारांमध्ये ESCP च्या संबंधित बाबींचा समावेश करणे ज्यामध्ये संबंधित E&S साधने, ESMF/ESMP, कामगार व्यवस्थापन प्रक्रिया आणि आचारसंहिता यांचा समावेश करणे, त्यानंतर कंत्राटदार त्यांच्या संबंधित करारांच्या E&S तपशीलांचे पालन करतात याची खात्री करणे. | खरेदी कागदपत्रे आणि संबंधित करार तयार करण्याचा भाग म्हणून.<br>प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान कंत्राटदारांवर देखरेख ठेवली जाईल. विनंतीनुसार बँकेला संबंधित करारांच्या प्रती प्रदान केल्या जाईल. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष(PMU) |
| १.३ | तांत्रिक सहाय्य<br>प्रकल्पाअंतर्गत सल्लामसलत, अभ्यास (लागू असल्यास व्यवहार्यता चाचणी सह), क्षमता बांधणी, प्रशिक्षण आणि इतर कोणत्याही तांत्रिक सहाय्य उपक्रम जे बँकेला मान्य असलेल्या अटी आणि ESS शी सुसंगत आहेत, राबविण्यात येतील. त्यानंतर संदर्भ अटींनुसार अशा उपक्रमांचा आढावा घेण्यात येईल. | प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) |

| | उपाय आणि कृती | कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| १.४ | पूर्वलक्षी वित्तपुरवठा अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही उपक्रमांसाठी<br>पूर्वलक्षी वित्तपुरवठा अंतर्गत येणाऱ्या कोणत्याही उपक्रमांसाठी अशा उपक्रमांनी ESS च्या आवश्यकता पूर्ण केल्या आहेत याची खात्री करण्यासाठी आवश्यक ती पडताळणी करणे अपेक्षित आहे. | प्रभावी तारखेपासून ६ महिन्यांच्या आत | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) |
| ESS २: श्रम आणि कार्य परिस्थिती | | | |
| २.१ | कामगार व्यवस्थापन प्रक्रिया(LMP)<br>ESMF चा भाग म्हणून कामगार व्यवस्थापन प्रक्रिया (LMP) तयार करणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे. | प्रभावी तारखेपासून ९० दिवसांच्या आत (LMP) तयार करणे आणि ESMF मध्ये समाविष्ट करून प्रकल्पदरम्यान अंमलबजावणी करणे. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) |
| २.२ | व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन योजना<br>कंत्राटदारांनी ESMF आणि LMP नुसार व्यावसायिक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन उपायांची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. | प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान LMP ची अंमलबजावणी करणे. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) |
| २.३ | प्रकल्प कामगारांसाठी तक्रार निवारण यंत्रणा<br>LMP मध्ये वर्णन केल्याप्रमाणे आणि ESS२ शी सुसंगत, प्रकल्प कामगारांसाठी तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करून कार्यान्वित करण्यात येईल. | प्रकल्प कामगारांना कामावर घेण्यापूर्वी तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करणे आणि त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान ती चालवणे. | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (PMU) |
| ESS ३: संसाधन कार्यक्षमता आणि प्रदूषण प्रतिबंध आणि व्यवस्थापन | | | |
| ३.१ | बांधकाम साहित्य स्रोत योजना<br>ESMP (E&S चेकलिस्ट) चा भाग म्हणून बांधकाम साहित्य स्रोत उपाय यादी तयार करणे आणि अंमलात आणणे. | प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान. | जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(DPIU) |
| ३.२ | संसाधन कार्यक्षमता, प्रदूषण प्रतिबंध आणि व्यवस्थापन<br>पाण्याचा वापर कार्यक्षमतेने करणे, कचरा विल्हेवाट लावणे, विशेषतः कीटकनाशकांसारख्या घातक पदार्थांसाठी, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे, मातीचे आरोग्य सुधारणे आणि शाश्वत शेती पद्धती यासाठी उपाययोजना तयार करणे आणि अंमलात आणणे. | प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान. | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(PMU) |

| | उपाय आणि कृती | कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| ३.३ | एकात्मिक कीड व्यवस्थापन व एकात्मिक अन्नद्रव्यं व्यवस्थापन (IPNM) योजना<br>रासायनिक कीटकनाशकांचा वापर कमी करून, पर्यावरणीय दुष्परिणाम कमी करण्यासाठी जैविक कीटकनाशकांना प्रोत्साहन देण्यासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि एकात्मिक अन्नद्रव्यं व्यवस्थापन योजना (IPNM) तयार करून त्याची अंमलबजावणि केल्या जाईल. | IPNM हे प्रभावी तारखेपासून ९० दिवसांच्या आत तयार केले जाईल आणि प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान त्याची अंमलबजावणी आणि देखरेख केली जाईल. | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(PMU) |
| ESS ४: सामाजिक आरोग्य आणि सुरक्षितता | | | |
| ४.१ | सामाजिक आरोग्य आणि सुरक्षितता<br>ESMF आणि ESMPs (E&S चेकलिस्ट) प्रमाणे सामुदायिक आरोग्य आणि सुरक्षितता उपाय स्वीकारून आणि अंमलात आणण्यात येईल. | प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(PMU) |
| ४.२ | लैंगिक शोषण आणि गैरवर्तन (SEA) व लैंगिक छळ (SH)<br>ESMF चा एक भाग म्हणून लैंगिक शोषण आणि हिंसाचार धोके कमी करण्याचे उपाय तयार करणे आणि अंमलात आणणे. | ESMF चा भाग म्हणून, प्रभावी तारखेपासून ९० दिवसांच्या आत SEA/SH कमी करण्याचे उपाय समाविष्ट करणे आणि प्रकल्पा दरम्यान त्यांची अंमलबजावणी करणे | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(PMU) |
| ESS ५: जमीन संपादन, जमीन वापरावरील निर्बंध आणि अनैच्छिक पुनर्वसन | | | |
| ५.१ | सध्या संबंधित नाही | | |
| ESS ६: जैवविविधतेचे संवर्धन आणि सजीव नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन | | | |
| ६.१ | सध्या संबंधित नाही | | |
| ESS ७: आदिवासी लोक/उप-सहारा आफ्रिकन ऐतिहासिकदृष्ट्या वंचित पारंपारिक स्थानिक समुदाय | | | |
| | | | |
| ७.१ | आदिवासी समुदाय नियोजन आराखडा<br>१. ESMF चा भाग म्हणून, ESS७ शी सुसंगत, प्रकल्पासाठी आदिवासी समुदाय विकास नियोजन आराखडा (IPPF) तयार करणे आणि आत्मसात करणे.<br>२. प्रकल्पांतर्गत, IPPF मध्ये नमुद केल्याप्रमाणे, ESS७ शी सुसंगत, आदिवासी लोक योजना (IPP) तयार करणे आणि अंमलात आणणे. | प्रभावी तारखेनंतर ९० दिवसांच्या आत IPPF तयार करणे १८० दिवसांच्या आत IPP तयार करून आणि प्रकल्पादरम्यान अंमलबजावणी करणे | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष(PMU) |

| उपाय आणि कृती | | कालावधी | जबाबदारी |
|---|---|---|---|
| ESS ८: सांस्कृतिक वारसा | | | |
| ८.१ | सध्या संबंधित नाही | | |
| ESS ९: वित्तीय मध्यस्थ [हे मानक फक्त वित्तीय मध्यस्थ (FIs) असलेल्या प्रकल्पांसाठीच लागू आहे] | | | |
| ९.१ | सध्या संबंधित नाही | | |
| १०.१ | भागधारक सहभाग योजना<br>प्रकल्पासाठी ESS१० शी सुसंगत, भागधारक सहभागी योजना (SEP) स्वीकारून आणि अंमलात आणली जाईल, ज्यामध्ये भागधारकांना संबंधित माहिती, सुलभतेने, समजण्यायोग्य,वेळेवर दिल्या जाईल. भागधारकांशी सांस्कृतिकदृष्ट्या योग्य पद्धतीने समन्वय साधला जाईल जो हाताळणी, हस्तक्षेप, जबरदस्ती, भेदभाव आणि धमकी रहित असेल. | प्रभावी तारखेनंतर ९० दिवसांच्या SEP स्वीकारून लागू करण्यात येईल आणि त्यानंतर संपूर्ण प्रकल्पा दरम्यान अंमलात आणले जाईल. | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PMU) and जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (DPIUs) |
| १०.२ | प्रकल्प तक्रार निवारण यंत्रणा<br>ESS१० शी सुसंगत, सुलभ आणि कार्यात्मक तक्रार निवारण यंत्रणा स्थापित करणे, प्रसिद्ध करणे, देखभाल करणे आणि चालवणे.<br>तक्रार निवारण यंत्रणा सुरक्षित, गोपनीय आणि पीडित - केंद्रित पद्धतीने, SEA/SH तक्रारी प्राप्त करण्यासाठी, नोंदणी करण्यासाठी आणि त्यांचे निराकरण सुलभ करण्यासाठी सुसज्ज असेल | प्रकल्प सुरू होण्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत किंवा प्रकल्प उपक्रम सुरू होण्यापूर्वी, यापैकी जे आधी असेल तेव्हापासून तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करणे आणि त्यानंतर प्रकल्प अंमलबजावणीदरम्यान ही यंत्रणा राखणे आणि चालवणे. | प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PMU) and जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (DPIUs) |
| अंमलबजावणी तयारीसाठी निर्देशक | | | |
| अंमलबजावणी तयारीसाठी खालील कृती सूचक आहेत:<br><br>PMU मध्ये नियुक्त केलेले विषय तज्ञ- सामाजिक विकास तज्ञ आणि पर्यावरण तज्ञ. | | | |

# प्रकल्प व्यवस्थापन कक्ष


नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
30ब, आर्केड, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड,
मुंबई, महाराष्ट्र ४००००५

https://mahapocra.gov.in